◆ ADVT ◆
येथे जाहिरात द्या
98700 06472 · need24.digital

NEED24 NEWS
हर ख़बर, हर शहर

नीड 24 न्यूज़

हर खबर, हर शहर

◆ ADVT ◆
येथे जाहिरात द्या
98700 06472 · need24.digital

DIGITAL E-PAPER

PRGI APPLICATION UNDER PROCESS
Application No. T/GJ/2026/0619/2304/1577

GST
GSTIN 24CINPG0564Q1ZT

UDYAM REGISTERED
UDYAM-GJ-14-0003714

◆ DIGITAL NEWS NETWORK ◆
भारताचे विश्वासार्ह बहुभाषिक डिजिटल न्यूज नेटवर्क
11+ Languages | 24×7 Live | e-Paper Daily

आमचे App डाउनलोड करा
Download on the App Store
GET IT ON Google Play

www.need24.digital
info@need24.in
+91 98700 06472
FOLLOW US:

तेज़ | सटीक | निष्पक्ष | जनहित में | सच की आवाज़ | जन-जन की आवाज़ | निडर पत्रकारिता

MAHARASHTRA | नीड 24 न्यूज़ · हर खबर, हर शहर | 29 नवम्बर 2026

स्थानीय

हेल्प फाउंडेशनने महात्मा फुले यांच्या पुण्यतिथीवर अभिवादन कार्यक्रम आयोजित



हेल्प फाउंडेशनने महात्मा ज्योतिराव फुले यांच्या पुण्यतिथीच्या निमित्ताने जालना वाटूर फाटा, प्रतिनिधी यांच्या अध्यक्षतेखाली अभिवादन कार्यक्रम आयोजित केला. कार्यक्रमात फुले यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करण्यात आला आणि उपस्थित मान्यवर व संस्थेच्या सदस्यांनी विनम्र अभिवादन केले.

कार्यक्रमाचे अध्यक्षत्व संस्थेचे अध्यक्ष श्री. एस. व्ही. आवारे यांनी केले, सहसचिव श्री. गौतम प्रधान यांची प्रमुख उपस्थिती होती. सभेत फुले यांच्या शैक्षणिक, सामाजिक व क्रांतिकारी योगदानावर प्रकाश टाकत, जातिभेद, अस्पृश्यता, अंधश्रद्धा व सामाजिक विषमता विरोधातील त्यांच्या निर्भीड लढ्याचा उल्लेख करण्यात आला.

फुले यांनी स्त्री शिक्षणाचा पाया घातला, बहुजन समाजाला शिक्षणाच्या प्रवाहात आणले व शोषित, वंचित घटकांना न्याय व समानतेचा अधिकार मिळवून देण्याचे उद्दिष्ट ठेवले. त्यांच्या विचारांनुसार शिक्षण हे सामाजिक परिवर्तनाचे प्रभावी साधन आहे, हा संदेश आजही महत्त्वाचा मानला जातो.

हेल्प फाउंडेशन शिक्षण, सामाजिक प्रबोधन व गरजू विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक विकासासाठी कार्यरत असून, फुले यांच्या सत्यशोधक व समतावादी विचारांचा वारसा पुढे नेण्याचा संकल्प पुन्हा व्यक्त केला. संस्थेचे सदस्य – भागवत माने, नारायण भगस, गोविंद रंगे, केतन चव्हाण, योगेश अवचार, आकाश चव्हाण, युवराज आवारे, शिवदर्शन रंगे, समाधान जाधव, कृष्णा चव्हाण, अविनाश राठोड, आकाश मगर, गौरव अग्रवाल, कृष्णा शिर्के, सोपान माने, रविराज आवारे – मोठ्या संख्येने उपस्थित होते.

कार्यक्रम प्रेरणादायी वातावरणात संपला, ज्यात फुले यांच्या विचारांचा जागर, शिक्षणातून समतेचा ध्यास व सामाजिक परिवर्तनाचा संकल्प यावर भर देण्यात आला.

— Prashant Pradhan

शिक्षा

चंद्रपूरची ममता ओगुलवार कोलकात्यात CITS परीक्षेत महिला टॉपर



कु. ममता परशुराम ओगुलवार, चंद्रपूर जिल्ह्यातील, कोलकात्यात आयोजित CITS (क्राफ्ट इन्स्ट्रक्टर ट्रेनिंग स्कीम) परीक्षेत अखिल भारतीय स्तरावर महिला टॉपर बनली, हे तिचे आणि जिल्ह्याचे अभिमानाचे क्षण आहेत.

राष्ट्रीय कौशल्य प्रशिक्षण संस्था, कोलकाता येथे 2026 मध्ये झालेल्या कौशल दीक्षांत समारंभात तिच्या कामगिरीचा गौरव करण्यात आला. या यशामुळे तिला राष्ट्रीय पातळीवर मान्यता मिळाली.

यानंतर महाराष्ट्र नवनिर्माण सेनेने तिच्या निवासस्थानी भव्य सत्कार केला. चंद्रपूर जिल्हा अध्यक्ष अमर अंधेवार, विधी सेना जिल्हा सचिव अॅड. महेंद्र विजोजवार, विभाग अध्यक्ष राकेश हनुमंते, शुभम रोहित थोर आणि अनेक मनसैनिक उपस्थित होते.

ममता ओगुलवारच्या यशामुळे चंद्रपूर जिल्ह्याचे नाव देशभरात रोशन झाले आहे. तिला आणि तिच्या कुटुंबाला हार्दिक अभिनंदन.

— Doctor Pintu Paul

यात्रा

अपघात रोखण्यासाठी मुरबाड पोलिसांची धडक मोहीम; कल्याण-अहिल्यानगर महामार्ग व म्हसा रोडवर चोख पोलीस बंदोबस्त आणि कडक तपासणी.



जिल्हा रिपोर्टर काशिनाथ देसले ठाणे सह

तालुका रिपोर्टर किशोर पवार मुरबाड

दिनांक २९/११/२०२६

विशेष वार्ता पत्र

ठाणे मुरबाड: सण-उत्सव, गर्दीचे दिवस आणि कल्याण-अहिल्यानगर महामार्ग तसेच म्हसा रोडवरील दिवसेंदिवस वाढणारी वाहनांची वर्दळ लक्षात घेता, संभाव्य रस्ते अपघात रोखण्यासाठी मुरबाड पोलिसांकडून विशेष वाहतूक सुरक्षा आणि नाकाबंदी मोहीम राबविण्यात आली आहे. केवळ अपघात घडल्यानंतर घटनास्थळी धाव घेणे एवढीच पोलिसांची जबाबदारी नसून, अपघात होऊच नयेत यासाठी आगाऊ खबरदारी घेणे हे देखील कर्तव्याचा महत्त्वाचा भाग आहे, या भावनेतून मुरबाड पोलिसांनी उचललेल्या या पावलाचे प्रवाशांकडून व स्थानिक नागरिकांकडून सर्वत्र कौतुक होत आहे.

चोख पोलीस बंदोबस्त आणि नियोजन:

या मोहिमेसाठी मुरबाड पोलीस प्रशासनाकडून अतिशय कडेकोट आणि नियोजनबद्ध पोलीस बंदोबस्त तैनात करण्यात आला होता. मुरबाड पोलीस उपविभागीय अधिकारी श्री. लाड यांच्या अधिपत्याखाली तसेच मुरबाड पोलीस स्टेशनचे मुख्य पोलीस निरीक्षक श्री. सचिन हुंदळेकर साहेब यांच्या थेट मार्गदर्शनाखाली पोलीस अधिकारी व कर्मचाऱ्यांची विशेष पथके तयार करण्यात आली होती.

कल्याण-अहिल्यानगर महामार्ग आणि म्हसा रोडवरील महत्त्वाच्या चौकांमध्ये, वळणांवर आणि गर्दीच्या ठिकाणी ठिकठिकाणी 'डायरी गेट' (बॅरिकेड्स) उभारून नाकाबंदी करण्यात आली. रात्रीच्या वेळी तसेच गर्दीच्या वेळेत वाहतुकीची कोंडी होऊ नये आणि अपघात टळावेत यासाठी पोलीस कर्मचारी मोठ्या संख्येने रस्त्यावर उतरून वाहतुकीचे योग्य नियंत्रण करत होते. संशयास्पद वाहनांची कसून तपासणी केली जात असल्याने संपूर्ण परिसरात पोलिसांचा मोठा दरारा आणि शिस्त पाहायला मिळाली.

बेशिस्त वाहनचालकांचे धाबे दणाणले:

या तपासणी मोहिमेदरम्यान प्रामुख्याने मद्यपान करून वाहन चालविणारे (ड्रंक अँड ड्राइव्ह), एकाच दुचाकीवरून तिघांनी (ट्रिपल सीट) प्रवास करणारे, भरधाव वेगाने वाहन चालविणारे आणि वाहतूक नियमांचे उल्लंघन करणाऱ्या बेशिस्त वाहनचालकांवर विशेष लक्ष केंद्रित करण्यात आले. अचानक करण्यात आलेल्या या कडक नाकाबंदीमुळे नियमांचे उल्लंघन करणाऱ्या वाहनचालकांचे धाबे दणाणले असून, महामार्गावरील व म्हसा रोडवरील वाहतुकीला मोठी शिस्त लागल्याचे चित्र दिसून येत आहे. प्रवाशांनी व स्थानिक ग्रामस्थांनी पोलिसांच्या या तत्परतेबद्दल समाधान व्यक्त केले आहे.

वाहनचालकांना पोलिसांचे कळकळीचे आवाहन:

या बंदोबस्तादरम्यान मुख्य पोलीस निरीक्षक श्री. सचिन हुंदळेकर साहेब यांनी सर्व नागरिकांना व वाहनचालकांना महत्त्वाचे आवाहन केले आहे:

• मद्यपान करून कोणत्याही परिस्थितीत वाहन चालवू नये.

• एकाच दुचाकीवर तीन प्रवासी (ट्रिपल सीट) बसवून प्रवास करू नये.

• महामार्ग व अंतर्गत रस्त्यांवर वेगमर्यादेचे काटेकोरपणे पालन करावे.

• दुचाकी चालवताना स्वतःच्या व कुटुंबाच्या सुरक्षिततेसाठी हेल्मेटचा नियमित वापर करावा.

वाहतूक नियमांचे काटेकोर पालन करून स्वतःसह इतरांचाही प्रवास सुरक्षित करावा आणि पोलीस प्रशासनाला सहकार्य करावे, असे आवाहन मुरबाड पोलीस स्टेशनच्या वतीने करण्यात आले आहे.

— Kashinath Desale, ठाणे

नौकरी

कुडवली येथील स्टारशाईन कंपनीवर सीटू (CITU) युनियनचे ‘टाळे ठोक आंदोलन’; १३० कामगारांना कामावर घेण्याची मागणी.



नीड २४ न्यूज महाराष्ट्र

जिल्हा प्रतिनिधी काशिनाथ देसले ठाणे सह

तालुका प्रतिनिधी किशोर पवार मुरबाड

दिनांक: २९/११/२०२६

ठाणे मुरबाड: (प्रतिनिधी):कामगार विशेष वार्ता पत्र.

कुडवली (ता. मुरबाड) येथील 'मे. स्टारशाईन मॅनिफॅक्चीरिंग प्रा. लि.' कंपनी प्रशासनाने १३० कामगारांना कामावरून बाहेर ठेवल्याच्या निषेधार्थ महाराष्ट्र इंजिनिअरिंग उद्योग कामगार संघटना (सीटू संलग्न) यांच्या वतीने कंपनीवर तीव्र 'टाळे ठोक आंदोलन' करण्यात आले. शुक्रवार, दिनांक २७ नोव्हेंबर २०२६ रोजी दुपारी १२ वाजता मोठ्या संख्येने कामगार आणि युनियन पदाधिकाऱ्यांनी कंपनीच्या गेटसमोर एकत्र येत प्रशासनाविरोधात जोरदार घोषणाबाजी केली.

कंपनी व्यवस्थापनाकडून कामगार कायद्यांचे उल्लंघन केले जात असल्याचा आरोप यावेळी संघटनेच्या वतीने करण्यात आला. आंदोलनादरम्यान युनियनने प्रशासनासमोर आपल्या पाच प्रमुख मागण्या मांडल्या आहेत:

१. कामगारांची पुनर्स्थापना: बाहेर ठेवलेल्या सर्व १३० कामगारांना तात्काळ पूर्ववत कामावर घेण्यात यावे.

२. दिवाळी बोनस: सर्व कामगारांना कामगार कायद्यानुसार हक्काचा दिवाळी बोनस देण्यात यावा.

३. किमान वेतन आणि कायमस्वरूपी नोकरी: सर्व कामगारांना किमान वेतनानुसार पगार देऊन त्यांना सेवेत कायम करण्यात यावे.

४. मालकांवर कारवाई: कामगार कायद्याचे उल्लंघन करणाऱ्या कंपनी मालकांवर प्रशासनाने कठोर कारवाई करावी.

५. युनियनसोबत चर्चा: कंपनी व्यवस्थापनाने कामगारांच्या पसंतीच्या युनियनसोबत तात्काळ बोलणी सुरू करावी.

पोलीस यंत्रणेची सलोख्याची भूमिका आणि मोलाचे सहकार्य:

घडू नये यासाठी मुरबाड पोलीस ठाण्याच्या वतीने कंपनी परिसरात चोख बंदोबस्त तैनात करण्यात आला होता. यावेळी पोलीस यंत्रणेने अत्यंत संयमी आणि सलोख्याची भूमिका घेत दोन्ही बाजूंमध्ये संवाद घडवून आणण्याचा प्रयत्न केला. या संपूर्ण प्रक्रियेत मुरबाड पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक मा. श्री. सचिन हुंदळेकर साहेब यांचे मोलाचे सहकार्य लाभले. त्यांच्या सकारात्मक पुढाकारामुळे आणि पोलीस प्रशासनाच्या योग्य समन्वयामुळे तणावपूर्ण परिस्थिती शांततेत हाताळली गेली.

दरम्यान, कामगारांच्या या रास्त मागण्या लवकरात लवकर मान्य न झाल्यास यापुढेही आंदोलन अधिक तीव्र करण्याचा इशारा महाराष्ट्र इंजिनिअरिंग उद्योग कामगार संघटनेच्या पदाधिकाऱ्यांनी दिला आहे.

— Kashinath Desale, ठाणे

स्थानीय

मुंबईतील सरकारी जमिनीवरील अतिक्रमणे तातडीने हटवा, आदेशानुसार कारवाई


जागतिक व्यापार केंद्र, सेंटर वन इमारत, ३२ वा मजला,
कफ परेड,मुंबई-४०० ००५
दिनांक: १० ऑक्टोबर, २०१३

वाचा - शासन परिपत्रक क्रमांक जमीन- ०३/२०१९/प्र.क्र.१३/ज-१, दिनांक ७ सप्टेंबर, २०१०.

प्रस्तावना

शासकिय जमीनीवरील अतिक्रमणास प्रतिबंध करणे व झालेली अतिक्रमणे तात्काळ निष्कासित करण्याबाबत वेळोवेळी आदेश निर्गमित करण्यात आलेले आहेत. मात्र अद्यापही क्षेत्रिय स्तरावर त्यानुषंगाने गांभीर्यपूर्वक कार्यवाही होत नसल्याचे शासनाच्या निदर्शनास आले आहे. काही प्रसंगी अतिक्रमणास शासकिय जमीनीच्या लगतच्या व्यक्ती/स्थानिक लोकांकडून विरोध होतो. अशावेळेस अतिक्रमणास स्थानिक लोकांनी विरोध केल्यास कायदा व सुव्यवस्थेची स्थिती बिघडण्याची शक्यता नाकारता येत नाही. मात्र जमीनीच्या मालकी हक्काच्या अनुषंगाने सरकारी यंत्रणेकडून फिर्याद न दाखल केल्यामुळे पोलीसांना परिणामकारक कार्यवाही करता येत नाही, असे गृह विभागाने निदर्शनास आणले होते. त्यानुसार या विभागाने दिनांक ७ सप्टेंबर, २०१० च्या शासन परिपत्रकान्वये सर्व क्षेत्रिय अधिका-यांना सूचना देण्यात आलेल्या आहेत. शासनाने दिनांक ७ सप्टेंबर, २०१० च्या शासन परिपत्रकान्वये निर्गमित करण्यात आलेल्या सूचनांच्या अनुषंगाने क्षेत्रिय कार्यालयाकडून गांभीर्यपूर्वक कार्यवाही होत नसल्याने लोकप्रतिनिधी व नागरिकांच्या तक्रारीच्या अनुषंगाने शासनाच्या निदर्शनास आले आहे. त्यानुषंगाने पुन्हा क्षेत्रिय स्तरावरील अधिका-यांना सूचना देण्याची बाब शासनाच्या विचाराधीन आहे.

शासन परिपत्रक

उपरोक्त पार्श्वभूमी आणारे क्षेत्रिय स्तरावरून सत्वर कारवाई होण्यासाठी दिनांक ७ सप्टेंबर, २०१० च्या शासन परिपत्रकाकडे क्षेत्रिय अधिका-यांचे लक्ष या आदेशाद्वारे वेधण्यात येत आहे. तसेच

राज्य सरकारने शासकीय, गायरान जमिनी व स्थानिक स्वराज्य संस्थांच्या मोकळ्या जागांवरील अतिक्रमणे रोखण्यासाठी कडक पावले उचलली आहेत. महसूल व वन विभागाने परिपत्रकाद्वारे स्पष्ट आदेश दिला आहे कि अतिक्रमणे केवळ रोखलीच नाही, तर तातडीने निष्कासित करणे व संबंधितांवर गुन्हे दाखल करणे आवश्यक आहे.

अनेक ठिकाणी सरकारी जमिनींवर अतिक्रमण होत असूनही स्थानिक प्रशासनाकडून अपेक्षित गांभीर्याने कारवाई होत नसल्याचे सरकारच्या निदर्शनास आले. स्थानिक लोकांच्या विरोधामुळे कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होतो, असे कारण पुढे केले जाते.

गृह विभागाने स्पष्ट केले आहे की, सरकारी यंत्रणा स्वतःहून फिर्याद दाखल न केल्यास पोलीस प्रभावी कारवाई करू शकत नाही. त्यामुळे संबंधित विभागांना त्वरित अतिक्रमण करणाऱ्यांविरुद्ध कारवाई करणे व कायदेशीर प्रक्रिया सुरू करणे आवश्यक आहे.

या उपाययोजनांमुळे अतिक्रमण थांबेल, कायदा व सुव्यवस्था राखली जाईल, आणि सरकारी जमिनींचा योग्य वापर सुनिश्चित होईल, असे सरकारचे उद्दिष्ट आहे.

— Doctor Pintu Paul, मुंबई

अपराध

छत्रपती संभाजीनगरमध्ये फ्लिपकार्ट डिलिव्हरी बॉयवर टवाळखोराची मारहाण, गुन्हा दाखल



छत्रपती संभाजीनगरच्या न्यायनगरातील गल्ली क्रमांक ९ मध्ये पिठाच्या गिरणीजवळ 26 नोव्हेंबर गुरुवारी रात्री सुमारे 9 वाजता घडलेल्या घटनेत, फ्लिपकार्टचा डिलिव्हरी बॉय दुचाकीवरून पार्सल वितरित करण्यासाठी जात असताना टवाळखोराने त्याला अडवून फरशी व हातातील कड्याने मारहाण केली.

डिलिव्हरी बॉयला मारहाणीतून जखमा झाल्यामुळे वैद्यकीय उपचार घ्यावे लागले. टवाळखोराने शारीरिक हिंसेचा वापर करून बळीला गंभीर इजा पोहोचवण्याचा प्रयत्न केला.

घटनेची तक्रार मिळाल्यानंतर पुंडलिकनगर पोलीस ठाण्याने त्वरित तपास सुरू केला आणि टवाळखोराविरुद्ध गुन्हा दाखल केला. सध्या आरोपीला अटक करण्यासाठी कारवाई सुरू आहे.

— Sayeed Shareq Sayeed Khaleq

गळफास घेऊन आत्महत्या केली



सावंगा जहांगिर येथे युवकाची आत्महत्या;

वाशिम, दि. २८ नोव्हेंबर :

जिल्हा प्रतिनिधी:वाशिम जिल्ह्यातील सावंगा जहांगिर येथे एका युवकाने आत्महत्या केल्याची धक्कादायक घटना उघडकीस आली आहे. या घटनेमुळे संपूर्ण गावात शोककळा पसरली आहे.

मिळालेल्या प्राथमिक माहितीनुसार, सदर घटना नेमकी कधी घडली हे अद्याप स्पष्ट झालेले नाही. ही घटना रात्रीच्या सुमारास घडली की पहाटेच्या सुमारास घडली, याबाबत अद्याप माहिती मिळालेली नाही. पोलिसांनी युवकाच्या नातेवाईकांकडे याबाबत सखोल विचारणा केली आहे.

घटना घडली त्यावेळी युवकाची आई घरी नव्हती, अशी माहिती जवळच्या नागरिकांनी दिली आहे. दरम्यान, सदर युवक हा चांगल्या स्वभावाचा व मनमिळाऊ होता, अशी चर्चा गावकऱ्यांमध्ये सुरू आहे.

या घटनेची माहिती मिळताच पोलिसांनी घटनास्थळी धाव घेत सदर सर्व घटनेचा पंचनामा करण्यात आला. पंचनाम्यानंतर पुढील कायदेशीर प्रक्रिया करण्यात आली असून, पुढील तपास *पोलीस निरीक्षक जगन्नाथ कोंडुजी घाटे साहेब* यांच्या मार्गदर्शनाखाली सुरू आहे. आत्महत्येचे नेमके कारण अद्याप समजू शकले नाही .

— Rashtrapal Dilip Sarkate

अपराध

छत्रपती संभाजीनगर लग्नसमारंभात १.४४ लाख रुपयांचा सोन्याचा ऐवज चोरीला



गुरुवारी, २६ नोव्हेंबर, दुपारी १२.०० ते १२.४५ वाजता छत्रपती संभाजीनगरच्या लग्नसमारंभात साडेतीन तोळ्याची सोन्याची पोत व ४,००० रुपये रोख असलेला एकूण १,४४,००० रुपयांचा ऐवज शिवाजीनगरातील मोरया मंगल कार्यालयातून चोरीला गेला.

ही चोरी सूचित करते की चोरटे लग्नसमारंभातही प्रवेश करीत आहेत, कारण चोरीचे ठिकाणच लग्नसमारंभाच्या परिसरातच होते. चोरीच्या वेळी कोणतीही सुरक्षा व्यवस्था कार्यरत नव्हती, ज्यामुळे चोरट्यांना सहज प्रवेश मिळाला.

पुंडलिकनगर पोलीसांनी त्वरित गुन्हा दाखल करून तपास सुरू केला. पोलीस अधिकाऱ्यांनी साक्षीदारांची माहिती गोळा करणे, CCTV फुटेज तपासणे व संभाव्य संशयितांवर कारवाई करणे याची घोषणा केली आहे.

— Sayeed Shareq Sayeed Khaleq

स्थानीय

उमरीतील आंबेडकर चौक ते मुदखेड रोडवरील वेगवाढीमुळे शाळकरी विद्यार्थ्यांना धोका



उमरी शहरातील आंबेडकर चौक ते मुदखेड रोड परिसरात वाहनांचा वेग मोठ्या प्रमाणात वाढल्याचे चित्र दिसून येत आहे. या मार्गावर गतिरोधक नसल्यामुळे वाहनचालक भरधाव वेगाने वाहने चालवत असून, काही वाहने 80 ते 90 किलोमीटर प्रतितास वेगाने धावत असल्याने नागरिकांच्या सुरक्षिततेचा प्रश्न निर्माण झाला आहे.

विद्यार्थी, लहान मुले तसेच पादचाऱ्यांना रस्ता ओलांडताना जीव मुठीत धरून जावे लागत आहे. भरधाव वाहनांमुळे विद्यार्थ्यांच्या जीवाला धोका निर्माण होण्याची शक्यता आहे.

तसेच रस्त्यावर झोपड तेल व इतर साहित्य पसरलेले असल्यामुळे वाहनचालकांना अचानक ब्रेक लावताना अडचणी येत आहेत. काही ठिकाणी वाहन घसरून अपघात होण्याची भीती असून वाहनांचे नुकसानही होत आहे.

रस्त्याचे काम करणारे कंत्राटदार व संबंधित अधिकारी यांच्याकडून रस्त्याच्या सुरक्षिततेकडे दुर्लक्ष होत असल्याचा आरोप नागरिकांकडून केला जात आहे. या मार्गावर तातडीने गतिरोधक बसवावेत, रस्त्यावरील चोपट तेल हटवून रस्ता सुरक्षित व व्यवस्थित करावा, तसेच शाळेजवळ वाहतुकीच्या सुरक्षिततेसाठी आवश्यक उपाययोजना कराव्यात, अशी मागणी नागरिकांकडून होत आहे.

एखादी दुर्घटना घडल्यानंतर प्रशासन जागे होणार का? की अपघात होण्यापूर्वीच उपाययोजना करण्यात येणार? असा सवाल नागरिक उपस्थित करत आहेत.

— G. P. G. U. .7798377959

स्थानीय

चंद्रपूरात गॅस चोरीचा पर्दाफाश: वृंदावन नगरात अवैध रिफिलिंग अड्ड्यावर धाड, ५१ सिलेंडर जप्त



चंद्रपूरच्या वृंदावन नगरात अवैध गॅस रिफिलिंग अड्ड्यावर धाड टाकण्यात आली आणि एकूण ५१ गॅस सिलेंडर (४३ घरगुती व ८ व्यावसायिक) व गोपिका इंडियन गॅस एजन्सीची टाटा एस गाडी जप्त करण्यात आली.

या अड्ड्यात गॅस एजन्सीच्या डिलिव्हरी गाड्या थेट येऊन विशेष नोझलच्या साहाय्याने घरगुती सिलेंडरमधून गॅस काढून रिकाम्या सिलेंडरमध्ये भरले जात होते, ज्यामुळे ग्राहकांना २ ते २.५ किलोपर्यंत गॅस कमी मिळत होता.

आम आदमी पक्षाच्या पदाधिकाऱ्यांनी संशयास्पद हालचालींवर लक्ष ठेवून पोलीस व अन्नधान्य पुरवठा विभागाला माहिती दिली, ज्यामुळे प्रशासनाने संयुक्त धाड टाकली.

अन्नधान्य पुरवठा अधिकारी सुमंत चव्हाण यांनी सांगितले की, जीवनावश्यक वस्तू कायदा १९५५ अंतर्गत कलम ३/७ नुसार या प्रकरणात गुन्हा दाखल होणार आहे.

८ दिवसांपूर्वीही याच भागात अशाच अवैध धंद्यावर धाड पडली होती, तरीही ७ दिवसांत पुन्हा हाच धंदा सुरू झाला, ज्यामुळे आम आदमी पक्षाने एजन्सीच्या सहभागावर आरोप केला आणि आमिष दाखवण्यात आल्याचा आरोप केला. पुरवठा विभागाने नागरिकांना डिलिव्हरी बॉयकडून वजन करून सिलेंडर घ्यावे आणि वजन न झाल्यास तक्रार करावी असे आवाहन केले.

— Doctor Pintu Paul

स्थानीय

चंद्रपूर जिल्ह्यात वाघांच्या नसबंदीचा प्रस्ताव केंद्राकडे! देशात पहिलाच प्रयोग?



चंद्रपूर : वाघांची वाढती संख्या आणि मानव-वाघ संघर्ष रोखण्यासाठी चंद्रपूर वन विभागाने वाघांच्या नसबंदीचा विशेष प्रस्ताव केंद्र सरकारकडे सादर केला आहे. असा प्रस्ताव पाठवणारा चंद्रपूर हा देशातील पहिला जिल्हा ठरला आहे.

घेऊन भाजपच्या ज्येष्ठ नेत्या शोभाताई फडणवीस यांनी चंद्रपूर वन विभागाच्या मुख्यालयावर धडक मारली होती. त्यावेळी मुख्य वनसंरक्षक रामानुजन यांनीच या प्रस्तावाची माहिती दिली. 94e0

ताडोबा-अंधारीसह जिल्ह्यात जवळपास ३५० वाघ असल्याचा अंदाज आहे. त्यामुळे गावांजवळ वाघांचा वावर वाढला आहे, माणसांवर आणि पाळीव जनावरांवर हल्ले वाढले आहेत.

वन विभागाने याला वाघांची 'फॅमिली प्लानिंग' असं म्हटलं आहे. पण एकीकडे वाघ वाचवा म्हणायचं आणि दुसरीकडे नसबंदी करायची, यावरून व्याघ्रप्रेमींमध्ये संतापही आहे.

आता केंद्र सरकार या प्रस्तावाला परवानगी देणार का, याकडे संपूर्ण जिल्ह्याचं लक्ष लागलं आहे.

— Doctor Pintu Paul

राजनीति

सामाजिक कार्यकर्ता राजेश भाऊ खंडेलोटे लवकरच राजकीय मैदानात, पक्षप्रवेशाची चर्चा



सामाजिक कार्यकर्ता आणि भिम आर्मी भारत एकता मिशन माझी तालुका अध्यक्ष राजेश भाऊ खंडेलोटे लवकरच राजकीय पक्षात प्रवेश करण्याची अफवा पसरली आहे.

त्यांच्या पक्षप्रवेशाबाबत राजकीय वर्तुळात उत्सुकता निर्माण झाली असून, कोणत्या पक्षात सामील होतील याबाबत विविध अंदाज लावले जात आहेत.

सामाजिक क्षेत्रातील त्यांच्या कार्यामुळे त्यांना मोठा पाठिंबा मिळाला आहे, आणि हा संभाव्य बदल स्थानिक राजकीय समीकरणांवर परिणाम करेल, असे तज्ञांचे मत आहे.

पक्षप्रवेशाची अचूक वेळ व पक्षाबाबत अधिक माहिती उपलब्ध होताच, राजकीय पक्ष आणि जनतेकडून प्रतिसाद अपेक्षित आहे.

— G. P. G. U. .7798377959

स्थानीय

उमरीतील गुरु रविदास मंगल कार्यालयात घाणीचे साम्राज्य: नागरिकांची नाराजी



उमरी शहरातील रवी नगर परिसरात गुरु रविदास मंगल कार्यालय सध्या अतिशय दयनीय अवस्थेत आहे. दारूच्या बाटल्या, देशी दारूच्या बाटल्या, बिअरच्या बाटल्या, पाण्याच्या बाटल्या आणि संडास व लघवीमुळे परिसरात घाणीचे साम्राज्य पसरले आहे, ज्यामुळे नागरिकांमध्ये मोठी नाराजी निर्माण झाली आहे.

या कार्यालयाच्या परिसरात दारूच्या बाटल्या व घाणीमुळे मोठ्या प्रमाणात अस्वच्छता निर्माण झाली आहे. नागरिकांनी नगरपालिकेचे दुर्लक्ष असल्याचा आरोप केला असून, सार्वजनिक ठिकाणी अस्वच्छता करणाऱ्यांवर कारवाई का होत नाही, असा प्रश्न उपस्थित केला आहे.

गुरु रविदास हे महान संत व समाजसुधारक असून त्यांच्या नावाने उभारलेले हे मंगल कार्यालय महापुरुषांच्या नावाचा सन्मान राखण्यासाठी महत्त्वाचे आहे. अशा दुरवस्थेने या कार्यालयाची प्रतिमा धोक्यात आली आहे आणि प्रशासनाची तसेच समाजाची जबाबदारी स्पष्ट होते.आहे मेन गेट तुटून गेलेले आहेत कुत्रे मांजर फिरत आहे

रविदास मंगल कार्यालयाची स्वच्छता करणे, परिसरात नियमित साफसफाईची व्यवस्था करणे आणि कार्यालयाची देखभाल करण्यासाठी योग्य उपाययोजना करणे याची नागरिकांनी मागणी केली आहे. महापुरुषांच्या नावाने असलेल्या सार्वजनिक ठिकाणाची विटंबना व दुरवस्था थांबवून गुरु रविदास यांच्या नावाचा सन्मान राखावा, अशी नागरिकांची प्रशासनाकडे मागणी आहे.

— G. P. G. U. .7798377959

स्थानीय

भोरमध्ये बालविवाहमुक्त भारत अभियान व अमली पदार्थांविरोधात जनजागृतीपर व्याख्यान संपन्न



भोर : जिल्हा विधी सेवा प्राधिकरण, पुणे, भोर तालुका विधी सेवा समिती, भोर बार असोसिएशन आणि श्री. काशिनाथराव खुटवड माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय, हातवे बु. यांच्या संयुक्त विद्यमाने शनिवार, दिनांक २८ नोव्हेंबर २०२६ रोजी विद्यालयात बालविवाहमुक्त भारत अभियान तसेच अमली पदार्थांचा गैरवापर व अवैध तस्करी या विषयांवर कायदेविषयक जनजागृतीपर व्याख्यान उत्साहात संपन्न झाले. या कार्यक्रमात विद्यालयातील सुमारे १५० विद्यार्थी व विद्यार्थिनींनी सहभाग घेतला.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी भोर वकील संघटनेचे अध्यक्ष ॲड. श्री. दत्तात्रय उरणकर होते. यावेळी बालविवाहमुक्त भारत अभियान या विषयावर ॲड. श्री. यशवंत शिंदे यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. बालविवाहाचे सामाजिक दुष्परिणाम, बालकांचे अधिकार, बालविवाह प्रतिबंधक कायद्यातील तरतुदी तसेच बालविवाह रोखण्यासाठी समाजाची भूमिका याबाबत त्यांनी सविस्तर माहिती दिली.

अमली पदार्थांचा गैरवापर व अवैध तस्करी या विषयावर भोर मधील हरजीवन हॉस्पिटलचे सुप्रसिद्ध डॉ. श्री. अमित शेठ यांनी मार्गदर्शन केले. अमली पदार्थांचे शारीरिक, मानसिक व सामाजिक दुष्परिणाम, व्यसनाधीनतेचे धोके तसेच तरुण पिढीने व्यसनांपासून दूर राहण्याचे महत्त्व याविषयी त्यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करून जनजागृती केली.

भोर वकील संघटनेचे वरिष्ठ सदस्य ॲड. श्री. शिवाजी मरळ यांनी देखील आपले थोडक्यात मनोगत व्यक्त केले.

या कार्यक्रमाचे विशेष बाब म्हणजे शाळेमधील दोन छोट्या चिमुकल्यांनी देखील आपले मनोगत व्यक्त केले.

यावेळी भोर वकील संघटनेचे उपाध्यक्ष ॲड. श्री. राकेश कोंडे, ॲड. श्री. विजय दामगुडे, ॲड. श्री. धनंजय दुधाने, ॲड.श्री. सुरज वीर तसेच हरजीवन हॉस्पीटलचे डॉ. श्रेया पारेख व न्यायालयीन कर्मचारी श्री. कैलास आखाडे उपस्थित होते.

विद्यालयाच्या प्राचार्या श्रीमती छाया खुटवड, सहशिक्षक श्री. अशोक मोहिते, श्री. शिवाजी ढेकाने, श्री. रमेश टकले, श्री. संतोष पवार, श्री. कृष्णा तामकर, श्री. ज्ञानेश्वर नेवसे, श्रीमती. वंदना गोरड व श्रीमती. दिपाली खुटवड यांचीही उपस्थिती होती.

कार्यक्रमाच्या माध्यमातून विद्यार्थ्यांमध्ये कायदेविषयक जागरूकता निर्माण करण्याबरोबरच बालविवाहमुक्त आणि अमली पदार्थमुक्त समाज निर्मितीचा संदेश देण्यात आला. विद्यार्थ्यांनी सामाजिक अनिष्ट प्रथा व व्यसनाधीनते विरोधात जागरूक राहून समाजात जनजागृती करण्याचा संकल्प करावा, असे आवाहन यावेळी करण्यात आले.

सदर कार्यक्रमाचा लाभ १५० विद्यार्थी व विद्यार्थिनींनी घेतला.

— किरण सदाशिव आंबिके

पाणी? आंधेकाऱ्यांची नाकी टेस्ट करा, नाहीतर हिवाळी अधिवेशनात अन्नत्याग आंदोलन - राजेश बेले*



घुग्घुस / चंद्रपूर : मेसर्स लॉयड्स मेटल्स अँड एनर्जी, लोहखनिज कारखाना, घुग्घुस यांच्याकडून घातक रसायन, घाण कचरा आणि रासायनिक द्रव्य उसगाव नाल्यामध्ये सोडले जात असल्याचा गंभीर आरोप पर्यावरणवादी राजेश बेले यांनी केला आहे.

बेले यांच्या म्हणण्यानुसार, वारंवार तक्रार देऊन, आंदोलन करूनही कारवाई झाली नाही. त्यानंतर २१ नोव्हेंबर २०२६ रोजी शनिवारी सकाळी ११ वाजता महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण महामंडळाचे अधिकारी कारखान्यात पाहणीसाठी गेले होते.

यात सदस्य सचिव, वैज्ञानिक प्रभारी अधिकारी विश्वजीत ठाकूर, चंद्रपूरचे क्षेत्रीय अधिकारी व प्रादेशिक अधिकारी तानाजी यादव, उपप्रादेशिक अधिकारी सुशीलकुमार राठोड आणि इतर अधिकारी उपस्थित होते, असे बेले यांनी सांगितले.

मात्र अधिकाऱ्यांनी कारखान्यात पाहणी केली, पण ज्या नाल्यामुळे १०० एकरपेक्षा जास्त शेतजमीन बाधित झाली आहे, त्या नाल्याची पाहणी केली नाही आणि पाण्याचे नमुने घेतले नाहीत, असा आरोप बेले यांनी केला आहे.

तसेच प्रादेशिक आणि उपप्रादेशिक अधिकाऱ्यांनी शहरातील आणि जिल्ह्यातील उद्योग कंपन्यांकडून मोठ्या प्रमाणात वसुली केल्याचा आरोपही त्यांनी केला आहे. ही वसुली कोणासाठी केली होती, हे समोर यावे म्हणून या अधिकाऱ्यांची नार्को टेस्ट करण्याची मागणी बेले यांनी केली आहे.

बेले म्हणाले, जर टेस्टमध्ये वसुली केली नाही, पैसा खाल्ला नाही, असा अहवाल आला तर न्यायालय, पोलीस प्रशासन आणि जिल्हा प्रशासन जी शिक्षा देईल ती भोगायला आम्ही तयार आहोत.

पण न्याय मिळाला नाही तर शेतकऱ्यांना, पर्यावरणाला आणि मानवी आरोग्याला धोका निर्माण करणाऱ्या या प्रकरणाविरोधात हिवाळी अधिवेशन काळात अन्नत्याग आंदोलन करू, असा इशारा त्यांनी दिला आहे.

— Doctor Pintu Paul

अपराध

छत्रपती संभाजीनगरच्या लायन्स क्लब कॉलनीतील ब्युटी पार्लरमध्ये चोरी, ३०,००० रुपये मूल्याचे सामान गमावले



छत्रपती संभाजीनगरच्या मुकुंदवाडीतील लायन्स क्लब कॉलनीत स्थित ब्युटी पार्लरमध्ये २५ नोव्हेंबर बुधवारी साडेपाचच्या सुमारास चोरी घडली.

चोरट्याने मेकअपचे सामान व चांदीचे दागिने चोरून नेले.

एकूण ३०,००० रुपयांचा ऐवज चोरीला गेला.

— Sayeed Shareq Sayeed Khaleq

वेल्हेतील तोरणा किल्ल्यावर खासदार डॉ. निलेश लंके यांचे डी-लिमिटेशन बिलावरील विधान



वेल्हे तालुका, पुणे जिल्हा, तोरणा किल्ल्यावर खासदार डॉक्टर निलेश लंके यांची भेट झाली. मावळ संघटनेच्या माध्यमातून आलेल्या लंके यांच्याशी प्रतिनिधी किरण आंबे यांनी संपर्क साधला आणि डी-लिमिटेशन बिलाबाबत पक्षातील मतभेद असल्याचे निदर्शनास आले.

लंके यांनी स्पष्ट केले की डी-लिमिटेशन बिल महत्त्वाचे आहे, परंतु संसदेत बिल पोहोचल्यावरच ते पूर्णपणे अभ्यासले जाईल. बारकावे शोधल्याशिवाय कोणताही निर्णय घेणार नाहीत, असे त्यांनी सांगितले. राष्ट्रीय काँग्रेस पक्षातील सर्व खासदार, शरद पवार यांच्या नेतृत्वाखाली, सुप्रिया ताई सुळे यांच्या मार्गदर्शनाखाली एकत्र येऊन निर्णय घेतील.

इंडिया गाडीच्या बैठकीत शरद पवार गटातील कोणताही खासदार उपस्थित नव्हता, असे सूत्रांनी सांगितले. लंके यांनी नमूद केले की ही बैठक सामान्यतः सुप्रिया ताई सुळे उपस्थित असतात, परंतु पवार साहेबांच्या तब्येत बिघडल्यामुळे ते हजेरी लावू शकले नाहीत. लंके यांना ही बैठक घेण्याचे काम दिले गेले, परंतु त्यांची तोरणा किल्ल्यावर पूर्वनियोजित मोहीम असल्यामुळे ते उपस्थित राहू शकले नाहीत; मोहीम लवकर संपल्यास ते आज दिल्लीला रवाना होतील.

काँग्रेस व शिवसेनेच्या नाराजगीबद्दल लंके यांनी सांगितले की त्याचा बिलावर कोणताही परिणाम नाही. त्यांनी भरून काढले की पक्षात अजूनही बिलाचा अभ्यास चालू आहे आणि कोणताही निर्णय घेण्यात आलेला नाही. कोणाला कोपऱ्यात ढकलणे चुकीचे आहे, असे त्यांनी टिप्पणी केली.

थाणे गटाचे संजय राउत यांनी शरद पवार आजारी असल्यामुळे भाजपने हे बिल आणले, आणि काही खासदारांना दीडशे कोटी रुपये मिळाले, असे आरोप केले होते. लंके यांनी या आरोपांना नाकारत म्हटले की त्यांना अशा कोणत्याही माहितीस नाही, आणि कोणत्याही खासदाराला इतकी रक्कम मिळाली याचा कोणताही पुरावा नाही.

— किरण सदाशिव आंबिके

अपराध

छत्रपती संभाजीनगरमध्ये नवदाम्पत्यांच्या कारवर हल्ला, नववधू जखमी



छत्रपती संभाजीनगरच्या पुंडलिकनगरातील आर्य समाज मंदिरात लग्न केल्यानंतर नवदाम्पत्य श्रीरामपूरला परतत असताना त्यांच्या कारवर सातारा पोलीस ठाण्याच्या हद्दीतील पाटोदा फाट्याजवळ दोन हल्लेखोरांचा हल्ला झाला. हल्ला २३ नोव्हेंबर रोजी रात्री सुमारे ८ वाजता घडला. हल्लेखोरांनी विनाक्रमांकाच्या कारमधून हल्ला केला आणि नववधूला जखमी केले.

हल्ल्यानंतर त्वरित स्थानिक पोलीस अधिकाऱ्यांनी घटनास्थळी पोहोचून जखमी नववधूची प्राथमिक उपचार केली आणि हल्लेखोरांचे तपास सुरू केले. हल्ल्याचा उद्देश आणि प्रेरणा याबाबत सध्या तपास चालू आहे.

या घटनेची माहिती पोलीस ठाण्याला २६ नोव्हेंबर गुरुवारी दुपारी सुमारे १ वाजता मिळाली. साक्षीदारांच्या विधानांनुसार हल्लेखोरांची ओळख अद्याप स्पष्ट झालेली नाही, परंतु तपासात त्यांचे ठिकाण आणि मोटारगाडीचे तपशील शोधले जात आहेत.

पोलीस अधिकाऱ्यांनी नागरिकांना सावध राहण्याचा आणि अनपेक्षित परिस्थितीत तत्काळ पोलीसांना कळविण्याचा सल्ला दिला आहे. या घटनेबद्दल अधिक माहिती मिळताच अद्यतनित केले जाईल.

— Sayeed Shareq Sayeed Khaleq

पूर्वसूचनेविना ड्रोन सर्व्हेचा घाट, मुरबाडमधील बळीराजा संतापला! 'कल्याण-लातूर' महामार्गाला कडाडून विरोध; तीव्र आंदोलनाचा इशारा.



जिल्हा रिपोर्टर काशिनाथ देसले, ठाणे सह

तालुका रिपोर्टर किशोर पवार, मुरबाड

दिनांक २८/११/२०२६.

नीड २४ न्यूज विशेष वार्ता

मुरबाड (प्रतिनिधी):

शासनाच्या महत्त्वाकांक्षी मानल्या जाणाऱ्या प्रस्तावित 'कल्याण-लातूर महामार्गा'च्या कामावरून आता मुरबाड तालुक्यातील राजकारण आणि समाजकारण चांगलेच तापले आहे. तालुक्यातील बाधित गावांमधील स्थानिक शेतकऱ्यांना कोणतीही पूर्वसूचना, नोटीस किंवा माहिती न देता थेट ड्रोनद्वारे जमिनींचे सर्वेक्षण करण्यात आल्याने परिसरातील बळीराजा संतप्त झाला आहे. प्रशासनाच्या या छुप्या कारभाराला कडाडून विरोध दर्शवत मुरबाड तालुक्यातील बाधित शेतकऱ्यांनी थेट महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळाच्या (MSRDC) मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांकडे लेखी निवेदन सादर करत आपली तीव्र हरकत नोंदवली आहे. शेतकरी कैलास चौधरी यांनी यासंदर्भात अधिकृत माहिती दिली असून, शेतकऱ्यांच्या या भूमिकेमुळे महामार्ग प्रशासनासमोर मोठे आव्हान उभे राहिले आहे.

नेमके प्रकरण काय?

नियोजित कल्याण-लातूर हा महामार्ग मुरबाड आणि माळशेज घाटामार्गे थेट लातूरला जोडला जाणार आहे. या महामार्गाच्या उभारणीसाठी महामंडळाकडून संबंधित भागातील जमिनींचे ड्रोनद्वारे सर्वेक्षण सुरू करण्यात आले आहे. मुरबाड तालुक्यातील तुळई, कळंबाड (बु.), वि, बांधिवली, आंबेगाव, कळंभे, पाडळे यांसह आसपासच्या गावांतील सुपीक शेतजमिनी या प्रकल्पाच्या कक्षेत येत आहेत. मात्र, हे सर्वेक्षण करताना प्रशासनाने किंवा सर्वेक्षण करणाऱ्या संबंधित खाजगी कंपनीने स्थानिक ग्रामस्थांना व शेतकऱ्यांना अजिबात विश्वासात घेतले नसल्याचा गंभीर आरोप भूमिपुत्रांनी केला आहे.

सुपीक भातशेती आणि उदरनिर्वाहाचा प्रश्न ऐरणीवर

मुरबाड तालुका हा प्रामुख्याने भातशेती आणि निसर्गसंपदेसाठी ओळखला जातो. येथील बहुतांश शेतकरी हे अल्पभूधारक असून त्यांचे संपूर्ण कुटुंब याच शेतीवर अवलंबून आहे. या प्रस्तावित महामार्गामुळे वर्षानुवर्षे जपलेली सुपीक भातशेती, फळबागा, मौल्यवान झाडे आणि राहती घरे बाधित होण्याची दाट शक्यता आहे. जर ही जमीनच हातातून गेली, तर अल्पभूधारक शेतकऱ्यांच्या उदरनिर्वाहाचा आणि भविष्याचा गंभीर प्रश्न निर्माण होणार असल्याची भीती निवेदनाद्वारे व्यक्त करण्यात आली आहे.

शेतकऱ्यांच्या चार प्रमुख मागण्या:

या पार्श्वभूमीवर बाधित शेतकऱ्यांनी एकजूट दाखवत प्रशासनासमोर चार ठोस मागण्या ठेवल्या आहेत:

• बेकायदेशीर सर्वेक्षण रद्द करा: शेतकऱ्यांची संमती आणि प्रत्यक्ष उपस्थिती नसताना परस्पर करण्यात आलेले ड्रोन सर्वेक्षण तात्काळ रद्द करण्यात यावे.

• प्रकल्पात पारदर्शकता आणा: नियोजित महामार्ग प्रकल्पाची संपूर्ण माहिती, अधिकृत नकाशा आणि नेमके कोणते क्षेत्र बाधित होणार आहे, याचा सविस्तर तपशील जाहीर करावा.

• आधी चर्चा, मगच काम: स्थानिक शेतकऱ्यांच्या हरकती, सूचना आणि मागण्यांचा सहानुभूतीपूर्वक विचार केल्याशिवाय आणि त्यांचे समाधान झाल्याशिवाय प्रकल्पाचे कोणतेही काम पुढे नेऊ नये.

डावलून किंवा पोलीस बळाचा वापर करून जबरदस्तीने प्रकल्पाचे काम रेटण्याचा प्रयत्न झाल्यास, संपूर्ण तालुका एकत्र येऊन तीव्र लोकशाही मार्गाने रस्त्यावर उतरून आंदोलन छेडेल, असा खणखणीत इशाराही निवेदनातून देण्यात आला आहे.

वरिष्ठ प्रशासनाकडे निवेदनाच्या प्रती

या गंभीर प्रकरणी प्रशासनाने तातडीने लक्ष घालून शेतकऱ्यांना विश्वासात घ्यावे आणि योग्य ती कार्यवाही करावी, अशी मागणी जोर धरत आहे. महामंडळाच्या मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांसह या निवेदनाच्या प्रती ठाणे जिल्हाधिकारी आणि मुरबाड तहसीलदार यांनाही सादर करण्यात आल्या आहेत. आता प्रशासन यावर काय भूमिका घेते, याकडे संपूर्ण तालुक्याचे लक्ष लागले आहे.

"कल्याण-लातूर महामार्गाचा ड्रोन सर्वे करताना स्थानिक शेतकऱ्यांना विश्वासात न घेता केलेले सर्वेक्षण पूर्णपणे अन्यायकारक आहे. शेतकऱ्यांच्या जमिनी आणि हक्कांचे संरक्षण करूनच प्रकल्पाची प्रक्रिया राबवावी; अन्यथा तीव्र आंदोलन छेडले जाईल."

— कैलास चौधरी (शेतकरी, तुळई)

— Kashinath Desale, ठाणे

स्थानीय

निवेदने आणि तक्रारी देऊन संतापलेल्या मनोज पाल यांनी आता ठिय्या आंदोलनाचा इशारा दिला आहे.



चंद्रपुरातील गायब होणारा रस्ता!

चंद्रपूर शहरात रोज सायंकाळी बंगाली कॅम्प चौकातील रस्ता गायब होतो. हे आश्चर्य वाटेल, पण हे खरं आहे.

बंगाली कॅम्प चौकातील वाईन शॉप, बार आणि बिर्याणी शॉपमुळे मुख्य रस्ता ४० फुटांवरून अवघ्या १५ फुटाचा होतो.

या मार्गावरून जड वाहने, बस, चारचाकी आणि दुचाकी वाहनांची मोठी गर्दी असते. मात्र सायंकाळ झाली की वाहनांना रस्ता शोधण्यासाठी चांगलीच कसरत करावी लागते.

या समस्येबद्दल भाजप महामंत्री मनोज पाल यांनी अनेकदा तक्रार आणि निवेदने दिली. तरीही झोपेत असलेल्या प्रशासनाला अजून जाग आलेली नाही.

रस्त्याच्या कडेला दारुडे उघडपणे दारू पिताना दिसतात. चंद्रपूर मनपाच्या झोन क्रमांक ३ समोर सुद्धा दारुडे बिनधास्त दारू पितात.

शहराची वाहतूक व्यवस्था सुरळीत राहावी हे काम चंद्रपूर वाहतूक नियंत्रक विभागाचे आहे. मात्र तो विभाग सामान्य नागरिकांना चलन करण्यात व्यस्त आहे.

शहरात इतर ठिकाणी सायंकाळी वाहतूक सुरळीत करण्याचा प्रयत्न केला जातो, तसाच प्रयत्न बंगाली कॅम्प चौक परिसरातही करायला हवा.

निवेदने आणि तक्रारी देऊन संतापलेल्या मनोज पाल यांनी आता ठिय्या आंदोलनाचा इशारा दिला आहे. येत्या काही दिवसांत ही समस्या सुटली नाही, तर आंदोलनाशिवाय पर्याय नाही, अशी प्रतिक्रिया त्यांनी दिली आहे.

— Doctor Pintu Paul

वडाळा स्कायवॉकवर अंधाराचे साम्राज्य : बहुतेक दिवे बंद, प्रवाशांच्या सुरक्षेचा प्रश्न ऐरणीवर



मुंबई, दि. २८ नोव्हेंबर : वडाळा रेल्वे स्थानक परिसरातील स्कायवॉकवर सध्या अंधाराचे साम्राज्य पसरले आहे. स्कायवॉकमधील बहुतेक दिवे बंद स्थितीत असल्याने रात्रीच्या वेळी प्रवाशांना अंधारातून वाट काढावी लागत आहे.

वडाळा हे मध्य रेल्वेवरील महत्त्वाचे स्थानक असून, दररोज हजारो प्रवासी स्कायवॉकचा वापर करतात. स्टेशन, बस थांबा आणि परिसरातील बाजारपेठेला जोडणारा हा स्कायवॉक प्रवाशांसाठी महत्त्वाचा मार्ग आहे. मात्र गेल्या काही दिवसांपासून येथील दिवे बंद असल्याने प्रवाशांमध्ये भीतीचे वातावरण आहे.

विशेषतः महिला, ज्येष्ठ नागरिक आणि विद्यार्थ्यांना रात्रीच्या वेळी स्कायवॉकवरून जाताना असुरक्षित वाटत आहे. अंधाराचा फायदा घेऊन चोरी, छेडछाड यांसारख्या घटना घडण्याची शक्यता प्रवाशांनी व्यक्त केली आहे. तसेच पायऱ्यांवर अंधार असल्याने पडून जखमी होण्याचा धोका देखील वाढला आहे.

याबाबत प्रवाशांनी अनेकदा तक्रार करूनही संबंधित विभागाकडून दखल घेतली जात नसल्याचा आरोप होत आहे. स्कायवॉकची देखभाल कोणाकडे आहे, दिवे बंद का आहेत, याबाबत प्रशासनाने तातडीने खुलासा करावा, अशी मागणी प्रवाशांकडून होत आहे.

"रात्री ८ नंतर स्कायवॉकवर पूर्ण अंधार असतो. मोबाईलच्या टॉर्चवर चालावे लागते. एवढ्या गर्दीच्या ठिकाणी अशी अवस्था असणे लाजिरवाणे आहे," अशी प्रतिक्रिया एका नियमित प्रवाशाने दिली.

प्रशासनाने तातडीने स्कायवॉकमधील सर्व दिवे दुरुस्त करून प्रवाशांना सुरक्षित आणि प्रकाशमान मार्ग उपलब्ध करून द्यावा, अशी मागणी जोर धरत आहे.

प्रवाशांच्या सुरक्षिततेसाठी त्वरित उपाययोजना करणे आवश्यक आहे.

— Ramesh Sukhdev Khandagale, मुंबई

जीवनशैली

मोहप पाझर तलावाच्या पूर रेषेपर्यंत अनधिकृत बांधकामे; दुष्काळी परिस्थितीतही बेकायदेशीर पाणी उपसा सुरूच, सहा गावांच्या पाणीपुरवठ्यावर आणि शेतीवर संकट..



मुरबाड (प्रतिनिधी) - '२४ न्यूज महाराष्ट्र'

जिल्हा प्रतिनिधी काशिनाथ देसले ठाणे सह

तालुका प्रतिनिधी किशोर पवार मुरबाड

दिनांक २८/११/२०२६

अनधिकृत पाणी उपसा विशेष वृत्त :

सहा गावांची तहान भागवणाऱ्या 'मोहप पाझर तलावा'च्या सुरक्षिततेचा व पाण्याच्या हक्काचा प्रश्न सध्या ऐरणीवर आला आहे. या तलावाच्या थेट पूर रेषा पातळीपर्यंत (Flood Line) कोणत्याही शासकीय परवानगीशिवाय अनधिकृत बंगले व फार्म डेव्हलपमेंट प्रकल्पांची बांधकामे करण्यात आली आहेत. एकीकडे परिसरात दुष्काळसदृश परिस्थिती निर्माण झाली असून तलावातील जलसाठा झपाट्याने कमी होत असताना, या खासगी प्रकल्पांकडून लाखो लिटर पाण्याचा अनधिकृत उपसा राजरोसपणे सुरूच आहे. या प्रकारामुळे सहा गावांच्या पिण्याच्या पाणीपुरवठा आणि स्थानिक शेतकऱ्यांची भाजीपाला व इतर पिके धोक्यात आली असून, यावर तात्काळ कारवाई करावी अशी लेखी मागणी मोहप ग्रामपंचायतीने तहसीलदार आणि पाटबंधारे विभागाकडे केली आहे.

पिण्याच्या पाण्यासोबतच शेतीही धोक्यात

मोहप पाझर तलावातील पाण्यावर मोहप, नारायणगाव, नायगाव, शिंपळे, डांगुर्ले आणि पडाचा पाडा या सहा गावांच्या पाणीपुरवठा योजना पूर्णपणे अवलंबून आहेत. तसेच परिसरातील अनेक शेतकरी या तलावाच्या पाण्यावर भाजीपाला व अन्य पिकांचे उत्पादन घेतात. मात्र, गेल्या तीन ते चार वर्षांपासून या भागात जानेवारी महिना सुरू होताच तीव्र पाणीटंचाई भासू लागली आहे. सध्या तलावातील जलसाठा कमी असताना आणि दुष्काळी परिस्थिती निर्माण झालेली असतानाही बेकायदेशीर उपसा सुरूच असल्याने ग्रामस्थ आणि शेतकरी हवालदिल झाले आहेत.

पूर रेषेपर्यंत अतिक्रमण आणि लाखो लिटर पाण्याचा वापर

या पाणीटंचाईमागे तलावाशेजारी सुरू असलेले अनधिकृत बांधकाम आणि वसाहतीकरण ('फार्म डेव्हलपमेंट' व बंगलो प्रोजेक्ट) हे मुख्य कारण असल्याचे ग्रामस्थांनी पत्रात नमूद केले आहे. या बांधकामांसाठी कोणतीही कायदेशीर परवानगी घेण्यात आलेली नसून, ती थेट तलावाच्या पूर रेषा पातळीपर्यंत उभारण्यात आली आहेत. या बंगलो प्रकल्पांसाठी गेल्या तीन-चार वर्षांपासून याच पाझर तलावातून लाखो लिटर पाण्याचा बेकायदेशीर उपसा केला जात आहे. हे काम पुढे आणखी किमान पाच ते दहा वर्षे सुरू राहण्याची चिन्हे असल्याने, स्थानिक गावांच्या हक्काच्या पाण्यावर आणि शेतीवर मोठी गदा आली आहे.

बांधाला लागूनच सुरूंग स्फोट; मोठ्या दुर्घटनेची भीती

तर तलावाच्या मुख्य बांधाच्या सुरक्षिततेशीही खेळ सुरू असल्याचा धक्कादायक प्रकार समोर आला आहे. गेल्या तीन वर्षांपासून या तलावाचा जो मुख्य बांध आहे, त्याला लागूनच अगदी २५ ते ३० फूट अंतरावर दगड फोडण्यासाठी मोठ्या प्रमाणात सुरूंग (ब्लास्टिंग) लावले जात आहेत. या शक्तिशाली स्फोटांमुळे तलावाच्या बांधाला तडे जाऊन किंवा बांध कमकुवत होऊन भविष्यात मोठी जीवित व वित्तहानी करणारी दुर्घटना घडण्याची भीती ग्रामस्थांकडून व्यक्त केली जात आहे.

प्रशासनाकडे लेखी निवेदन

या संपूर्ण प्रकरणाचे गांभीर्य लक्षात घेऊन मोहप ग्रामपंचायतीने मुरबाडचे तहसीलदार आणि पाटबंधारे विभागाचे उपअभियंता यांना अधिकृत लेखी निवेदन दिले आहे. या निवेदनावर सरपंच सौ. तनुजा हरेश ठाकरे, उपसरपंच श्री. तुषार काळुराम विशे आणि ग्रामपंचायत सदस्यांच्या स्वाक्षऱ्या आहेत.

सहा गावांच्या पिण्याच्या पाण्याचा प्रश्न, शेतकऱ्यांची होणारी आर्थिक नुकसानभरपाई, अनधिकृत बांधकामे आणि तलावाची सुरक्षितता लक्षात घेता, महसूल व पाटबंधारे प्रशासन या बांधकाम व्यावसायिकांवर नेमकी काय कारवाई करणार आणि तलावाचे रक्षण कसे करणार, याकडे आता संपूर्ण मुरबाड तालुक्याचे लक्ष लागले आहे.

— Kashinath Desale, ठाणे

विमा घोटाळ्याचा संशय की पूर्वनियोजित कट? सुरत ग्रामीण पोलिसांकडून तपास सुरू; एका संशयिताला ताब्यात घेतल्याची माहिती!



जळगावच्या पाटील कुटुंबावर गुजरातमध्ये जीवघेणा हल्ला! चार जणांचा दुर्दैवी मृत्यू; १३ वर्षीय मुलीच्या धाडसामुळे प्रकरणाला नवे वळण!

विमा घोटाळ्याचा संशय की पूर्वनियोजित कट? सुरत ग्रामीण पोलिसांकडून तपास सुरू; एका संशयिताला ताब्यात घेतल्याची माहिती!

जिल्ह्यातील पाटील कुटुंबासोबत घडलेल्या एका धक्कादायक घटनेने महाराष्ट्र आणि गुजरातमध्ये खळबळ उडाली आहे. कामाच्या शोधात सुरत येथे गेलेल्या या कुटुंबाचा प्रवास अत्यंत दुर्दैवी ठरला. या घटनेत चार जणांचा मृत्यू झाल्याची माहिती समोर आली असून, एका १३ वर्षीय मुलीच्या धाडसामुळे या संपूर्ण प्रकरणाचा उलगडा होण्यास मदत झाल्याचे वृत्त आहे

या घटनेत नितीन ऊर्फ भुरिया पाटील, त्यांची पत्नी कविता पाटील आणि एका मुलीसह चार जणांचा मृत्यू झाल्याचे वृत्त आहे. या घटनेमुळे पाटील कुटुंबावर दुःखाचा डोंगर कोसळला आहे.

१३ वर्षीय मुलीच्या धाडसामुळे प्रकरणाला वाचा!

या संपूर्ण प्रकरणात १३ वर्षीय मुलीच्या धाडसाची महत्त्वाची भूमिका असल्याचे वृत्तात नमूद करण्यात आले आहे. तिच्या धाडसामुळे घटनेबाबत महत्त्वाची माहिती समोर आल्याचे सांगितले जात आहे.

दरम्यान, कुटुंबातील १५ वर्षीय मुलगा अद्याप बेपत्ता असल्याची माहितीही या वृत्तात देण्यात आली आहे.

पोलिसांची कारवाई काय?

मिळालेल्या माहितीनुसार, या प्रकरणात चौघांविरोधात हत्येचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे. एका संशयिताला पोलिसांनी ताब्यात घेतल्याची माहिती असून, उर्वरित आरोपींचा शोध सुरू असल्याचे वृत्त आहे.

पाटील कुटुंबाला भावपूर्ण श्रद्धांजली!

— Rajendra Patil, सूरत

वेल्हा तालुक्यातील तोरणा किल्ल्यावर खासदार डॉ. निलेश लंके यांच्या आपला मावळ संघटनेच्या माध्यमातून खासदार डॉक्टर निलेश लंके यांची स्वच्छता संवर्धन आणि ऐतिहासिक वारसा जतन करण्याच्या उद्देशाने मोहीम



वेल्हा, पुणे: वेल्हा तालुक्यातील तोरणा किल्ल्यावर छत्रपती शिवरायांनी स्वराज्याचे पहिले तोरण बांधले. या किल्ल्याचे स्वच्छता संवर्धन व ऐतिहासिक वारसा जतन करण्याच्या उद्देशाने खासदार डॉक्टर निलेश लंके यांनी आपला मावळ संघटनेच्या माध्यमातून मोहीम सुरू केली. फेब्रुवारी २०२५ पासून शिवनेरी किल्ल्यापासून सुरुवात करून आज तोरणा किल्ल्यावर पोहोचले. प्रतिनिधी किरण आंबिके यांच्याशी संवाद साधताना त्यांनी सांगितले की गडकोट किल्ल्याची दुरावस्था झाली आहे आणि त्याची दुरुस्ती आवश्यक आहे. या मोहिमेचा उद्देश किल्ल्याच्या आठवणी व इतिहास गावागावात पोहोचवणे, डॉक्युमेंटरी बनवणे आणि राज्य व केंद्र सरकारकडून आवश्यक मदतीची मागणी करणे आहे. आतापर्यंत १८ किल्ल्यांची सफाई करण्यात आली असून सर्व किल्ल्यांवर छत्रपती शिवरायांचा इतिहास कोरला जाईल.

— किरण सदाशिव आंबिके

सरकारी योजना

पशुपालकांसाठी मोठी संधी! ‘मुख्यमंत्री ग्रामीण पशुधन उद्योजकता योजना २०२६’ साठी ऑनलाईन अर्ज प्रक्रिया सुरू.



जिल्हा रिपोर्टर काशिनाथ देसले ठाणे सह

तालुका रिपोर्टर किशोर पवार मुरबाड

मुंबई, दि. २८ नोव्हेंबर २०२६ (मुंबई नीड २४ न्यूज महाराष्ट्र):

विशेष वृत्त

महाराष्ट्र राज्यातील ग्रामीण भागातील तरुण, शेतकरी आणि पशुपालकांना स्वतःचा व्यवसाय सुरू करण्यासाठी राज्य शासनाच्या पशुसंवर्धन विभागामार्फत राबवण्यात येणाऱ्या ‘मुख्यमंत्री ग्रामीण पशुधन उद्योजकता योजना २०२६’ अंतर्गत ऑनलाईन अर्ज स्वीकारण्यास सुरुवात झाली आहे. २६ नोव्हेंबर २०२६ पासून MahaDBT 2.0 पोर्टलवर ही प्रक्रिया सुरू करण्यात आली असून, इच्छुक पशुपालकांनी लवकरात लवकर अर्ज करण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

• कोणत्या व्यवसायांसाठी मिळणार लाभ? या योजनेअंतर्गत दुग्धव्यवसाय (२, ४, ५ किंवा ६ दुभत्या गाई/म्हशींचा गट), शेळी व मेंढी पालन, कुक्कुटपालन, वराह पालन तसेच मुरघास (चारा) निर्मिती प्रकल्पांसाठी आर्थिक अनुदान दिले जाणार आहे.

• अनुदानाचे प्रमाण: या योजनेतून सर्वसाधारण प्रवर्गातील लाभार्थ्यांना प्रकल्प खर्चाच्या ५० टक्के, तर अनुसूचित जाती (SC) आणि अनुसूचित जमाती (ST) प्रवर्गातील लाभार्थ्यांना ७५ टक्के शासकीय अनुदान मिळणार आहे. हे अनुदान थेट लाभार्थ्यांच्या आधार संलग्न बँक खात्यात (DBT) जमा केले जाईल.

• निवड पद्धत: या योजनेत लॉटरी पद्धतीऐवजी ‘प्रथम येणाऱ्यास प्रथम प्राधान्य’ (First Come, First Served) या तत्त्वावर लाभार्थ्यांची निवड केली जाणार आहे. एका कुटुंबातील केवळ एकाच व्यक्तीला या योजनेचा लाभ घेता येईल.

अर्जासाठी आवश्यक कागदपत्रे:

इच्छुक अर्जदारांनी ऑनलाईन अर्ज भरण्यापूर्वी खालील कागदपत्रे तयार ठेवणे आवश्यक आहे:

१. MahaID आणि फार्मर आयडी (Farmer ID): महाडीबीटी २.० पोर्टलवर लॉग-इन करण्यासाठी MahaID अनिवार्य आहे.

२. आधार कार्ड (मोबाईल क्रमांकाशी संलग्न असलेले) व रेशन कार्ड.

३. आधार लिंक असलेल्या सक्रिय बँक खात्याचे पासबुक.

४. जमिनीचा अद्ययावत ७/१२ आणि ८-अ उतारा (लागू असल्यास).

५. जातीचा दाखला (मागासवर्गीय प्रवर्गातील लाभार्थ्यांसाठी).

६. पशुधनाची ‘भारत पशुधन’ प्रणालीवर नोंदणी केल्याचा तपशील (जवळच्या पशुवैद्यकीय दवाखान्यातून अद्ययावत करून घ्यावा).

अर्ज कुठे आणि कसा करावा?

पशुपालकांनी शासनाच्या अधिकृत MahaDBT 2.0 पोर्टलवर जाऊन ‘पशुसंवर्धन विभागाच्या योजना’ या पर्यायाअंतर्गत ‘मुख्यमंत्री ग्रामीण पशुधन उद्योजकता योजना’ निवडून आपला अर्ज सादर करावा. तसेच, जवळच्या आपले सरकार सेवा केंद्र किंवा महा ई-सेवा केंद्रावरूनही अर्ज करता येईल.

अधिक माहिती व तांत्रिक मदतीसाठी पशुपालकांनी पशुसंवर्धन विभागाच्या १९६२ या टोल-फ्री क्रमांकावर किंवा महाडीबीटी हेल्पलाईन ०२२-६१३१६४१२ वर संपर्क साधावा.

— Kashinath Desale, ठाणे